ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २८ डिसेंबर, १९५५ | अंक ४८

## विविध माहिती

**इजिप्तला ब्रिटनची मदत**—नाईल नदीवर आस्वान ह्या ठिकाणीं बांधण्यांत येणाऱ्या मोठ्या धरणासाठी ब्रिटननें व अमेरिकेनें इजिप्तला आर्थिक साह्य देऊं केलें आहे. हें धरण दोन टप्प्यांनीं पूर्ण करण्यांत यावयाचें आहे. सध्यां देऊं केलेली मदत पहिल्या टप्प्यासाठीं आहे. तथापि दुसऱ्या टप्प्यासाठीहि आणखी मदत देण्यांत येणार आहे. सर्व धरणासाठी १ अब्ज, ३० कोटी डॉलर्स खर्च येईल असा अंदाज आहे.

**भारतांत सोव्हिएट तंत्रज्ञ येणार**—भारत आणि रशिआ ह्यांच्यांत झालेल्या आर्थिक कराराचा तपशील ठरविण्यासाठी सोव्हिएट तंत्रज्ञांचें व अधिकाऱ्यांचें एक मंडळ भारतांत येणार आहे. भारत रशिआकडून पोलादाच्या, तेलाच्या व खाणींच्या कारखान्यांची यंत्रसामुग्री घेणार असून त्याच्या बदला कच्च्या मालाची खरेदी करणार आहे.

**३० लाख कामगारांना काम**—मुंबईतील एक उद्योगपती श्री. प्राणलाल पटेल ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं दरवर्षी १० लाख टन पोलाद निर्माण करणारा कारखाना काढण्यांत आला तर त्यामुळ ३० लाख लोकांना रोजगार मिळूं शकेल. त्याच प्रमाणें, दरडोई पोलादाचें उत्पादन ६ पौंडांवरून ६० पौंडांपर्यंत वाढेल. मुंबईतील कारखानदारांना ह्या बाबतींत आशादायक वातावरण आहे, असेंहि ते म्हणाले.

**कलकत्ता कॉर्पोरेशनचें अंदाजपत्रक**—कलकत्ता कॉर्पोरेशनच्या १९५६–५७ सालच्या अंदाजपत्रकांत ५२·२६ लाख रुपयांची तूट दाखविण्यांत आली आहे. उत्पन्नाच्या बाजूला ६,५९,८४,००० रुपये दाखविण्यांत आले असून खर्च ७,१२,१०,००० रुपयांचा दाखविण्यांत आला आहे. तथापि सर्व तूट शिलकी रकमेंतून भरून काढण्यांत येणार आहे. नवीन कर बसविण्यांत येणार नाहींत.

**कॅनडाकडून मिळणाऱ्या मदतींत वाढ**—कोलंबो योजनेप्रमाणें पुढील वर्षी कॅनडाकडून मिळणाऱ्या मदतीच्या रकमेंत वाढ करण्यांत आली आहे. प्रथम २·६४ कोटी डॉलर्स मिळणार होते. पण आतां ३·४४ कोटी डॉलर्स मिळणार आहेत. कॅनडानें भारताला अणुशक्ति निर्माण करणारी भट्टी देण्याचें कबूल केल्यामुळें मदतीची रकम वाढवावी लागली.

**पोलंडमधून रेल्वे डबे येणार**—ऑक्टोबर, १९५६ पूर्वी पोलंडकडून भारतीय रेल्वेवर वापरण्यासाठी २,६०० डबे आयात करण्यांत येणार आहेत. हे डबे भारतानें सुचविलेल्या नमुन्याप्रमाणें पोलंडमधील एका बड्या कारखान्यांत मुद्दाम बनविण्यांत येणार आहेत.

**जामनगरला पाण्याचा पुरवठा**—जामनगरला पाण्याचा पुरवठा करणाऱ्या योजनेच्या कामाला पुढील वर्षाच्या प्रारंभीं सुरवात होईल. शहरापासून ५ मैल अंतरावर होणाऱ्या रणजितसागर धरणापासून नळ टाकण्यांत येतील. योजनेसाठीं ६६ लाख रुपये खर्च येणार असून ती १९५९ मध्यें पुरी होईल. त्यानंतर शहराला रोज ६०,००,००० गॅलन पाणी मिळूं शकेल.

**ओखा बंदरांतील कारखाना**—ओखा बंदरांत अरुंद रुळावर चालणाऱ्या रेल्वेचे मालवाहू डबे जुळविण्याचा कारखाना आहे. कारखान्याचें उत्पादन दुप्पट करण्यासाठी त्याची पुनर्घटना करण्यांत येणार आहे. पुनर्घटना पूर्ण झाल्यावर रोज ४० मालवाहू डबे त्यांत जुळविण्यांत येतील. दरमहा १,००० डबे जुळविण्यांत येतील.

**भारत व पश्चिम जर्मनी ह्यांचा व्यापार**—पश्चिम जर्मनीचे डेप्युटी चॅन्सेलर हर ब्लूशर येत्या जानेवारीच्या प्रारंभाला भारताला भेट देणार आहेत. त्यावेळीं भारत व पश्चिम जर्मनी ह्यांच्या दरम्यान आर्थिक सहकार्य करण्यासंबंधीं अधिक वाटाघाटी होतील. चालू वर्षाच्या जानेवारी ते ऑगस्ट ह्या कालांत भारतानें पश्चिम जर्मनीला ११ कोटी रुपयांचा माल पुरविला. उलटपक्षीं, भारतानें ३३·७८ कोटी रुपयांचा माल आयात केला.

**कच्छच्या आखातांत दीपगृह**—कच्छच्या आखातांत नवें दीपगृह बांधण्यांत येणार आहे. दीपगृह ओखा बंदरापासून २० मैलांवर बांधण्यांत येणार असून त्यासाठी ४५,००,००० रुपये खर्च येणार आहे. ज्या खडकावर तें बांधण्यांत येणार आहे तो समुद्राच्या पाण्यांत ४५ फूट खालीं आहे. बांधणीचें काम एका स्वीडिश एंजिनिअराच्या देखरेखीखालीं करण्यांत येईल.

**कर्ज मिळण्यास अडचण**—जळगांवच्या नगरपालिकेनें भूमिगत ड्रेनेजची सोय करण्यासाठी ३ लाख रुपयांचें कर्ज काढण्याचें ठरविलें होतें. पण लोकांकडून पुरेशी मागणी न आल्यामुळें भरणा करण्याची मुदत वाढविण्यांत आली. ह्या कामासाठी होणाऱ्या खर्चापैकीं ७ लाख रुपयांची रकम म्युनिसिपालिटीनें जमा करावयाची आहे.

**फोर्ड फौंडेशनच्या देणग्या**—अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशन ह्या संस्थेनें देशांतील कॉलेजांना व इस्पितळांना देणग्या देण्यासाठी ५० कोटी डॉलर्सची रकम मंजूर केली आहे. संस्था १९३६ सालीं स्थापन झालेली आहे. तेव्हांपासून आतांपर्यंत एका रकमेनें एवढी मोठी रकम देणग्यासाठी जाहीर करण्याची ही पहिली वेळ आहे.

**साखरेचे ४० नवे कारखाने**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत भारतांत साखरेचे ४० नवे कारखाने काढण्याचें घाटत आहे. सध्यां भारतांत १६० कारखाने असून ते दरवर्षी १२० कोटी रुपयांची साखर करतात. ह्या धंद्यांत सुमारें ७२ कोटी रुपयांचें भांडवल गुंतलें आहे व १,४०,००० कामगारांना त्यांत रोजगार मिळालेला आहे. साखरेच्या बाबतींत देश आतां स्वयंपूर्ण झाला असून वाढत्या उत्पादनामुळें कांहीं वर्षांत साखरेची निर्यातहि करतां येईल.

**कारवारजवळ प्रसूतिगृह**—मुंबई सरकारच्या आरोग्य खात्याचे उपमंत्री, श्री. जत्ती ह्यांनीं कारवारपासून ८ मैलांवर असलेल्या अंगडी ह्या गांवीं बांधण्यांत यावयाच्या प्रसूतिगृहाचा पायाचा दगड बसविला. सैन्यांतून निवृत्त झालेल्या सैनिकांच्या बायकांसाठी तें मुख्यतः बांधण्यांत येणार आहे. सर व्हिक्टर ससून ट्रस्टमधून इमारतीसाठी ३५,००० रुपयांची देणगी मिळाली आहे.

**पेप्सु सरकारचें येणें**—पेप्सु सरकारचें १ मार्च, १९५४ अखेर ८,००,००० रुपयांचें येणें होतें. सरकारनें पाणी व वीज पुरविल्याबद्दलच्या येण्याची ही रक्कम आहे. देणेदारांत राज्यांतील पूर्वीचे कांहीं राजेरजवाडे, मंत्री, उपमंत्री, पार्लमेंटरी सेक्रटरी व खुद्द सरकारचीं कांहीं खातीं, ह्यांची गणना आहे. विधान सभेला सादर करण्यांत आलेल्या ऑडिट रिपोर्टांत ही माहिती आहे.

**भारताला अमेरिकेची मदत**—अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेनें भारताला विविध प्रकारची यंत्रसामुग्री विकत घेण्यासाठी २,०९,७६४ डॉलर्सची रक्कम मदत म्हणून देऊं केली आहे. शेतीविषयक संशोधन, शिक्षण, आंकडेमोड करणारीं यंत्रें, इत्यादि अनेक प्रकारची सामुग्री ह्या रकमेंतून विकत घेण्यांत येईल. भारताचे वॉशिंग्टनमधील खरेदी-मंडळ सौदे करील.

**अणुशक्ति कामी लावली तर**—भारताच्या नियोजन-समितीचे सभासद डॉ. जे. सी. घोष ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, देशांतील युरेनिअमच्या व थोरिअमच्या सांठ्याचा अणुशक्तीच्या निर्मितीसाठी उपयोग करण्यांत आला तर भारतामधील जनतेच्या रहाणीचें मान अमेरिकेच्या बरोबरीचें करतां येईल, इतकेंच नव्हे तर २०० वर्षें तें तसें टिकवितांहि येईल.

**आणखी एक बंधारा**—बुंदेलखंडांतील सुमारें २७,००० एकर जमिनीला पाण्याचा हुकमी पुरवठा करणाऱ्या अर्जुन नदीवरील धरणाचें काम पूर्ण झालें आहे. बंधाऱ्याची लांबी १६,००० फूट असून त्याची अधिकांत अधिक उंची ७५ फूट आहे. बंधारा संपूर्णतया मातींत बांधण्यांत आला आहे. काम पूर्ण होण्यास १॥ वर्षांचा कलावधि लागला.

**झेकोस्लोव्हाकिआची देणगी**—झेकोस्लोव्हाकिआनें आपल्या औद्योगिक मालाचें एक प्रदर्शन रंगून येथें उघडलें होतें. प्रदर्शनासाठी दोन लाख रुपये खर्चून एक इमारतहि बांधण्यांत आली होती. ही इमारत आणि तींत मांडलेली यंत्रसामुग्री व इतर साहित्य झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारनें ब्रह्मदेशाला भेट म्हणून दिलें आहे. प्रदर्शन पहाण्यास खूप गर्दी लोटली होती.

**रतलामचा पाणीपुरवठा**—रतलाम शहराला पाण्याचा पुरवठा करण्यासाठी तेथून १२ मैलांवर असलेल्या नदीचा उपयोग करून घेण्यांत येणार आहे. नदींतील पाणी दोन पंपांच्या साह्यानें १०० फूट उंचीवरील टाक्यांत चढविण्यांत येईल व तेथून नळानें शहराला पुरविण्यांत येईल.





५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईंतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



# अर्थ

बुधवार, ता. २८ डिसेंबर, १९५५





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## फोर्डच्या खाजगी साम्राज्यांत सामान्यांना प्रवेश

### वॉल स्ट्रीटमध्यें होणारा नफा शिक्षणकार्याला मिळणार

फोर्ड मोटार कंपनीच्या भागांपैकी ८८% भाग फोर्ड फौंडेशन ह्या खाजगी ट्रस्टच्या मालकीचे आहेत. शैक्षणिक कार्याला मदत करणें हा ह्या ट्रस्टचा उद्देश आहे. मतदानाचा हक्क असणारे सर्व भाग फोर्डच्या घराण्यांतच विभागलेले आहेत. त्या भागांपैकी ६०% भाग जनतेला विकण्यांत येणार आहेत. अशा रीतीनें, फोर्ड कंपनीच्या मालकीमध्यें सामान्य नागरिकांना स्थान मिळणार आहे आणि हेन्री फोर्डच्या खाजगी साम्राज्यांत त्यांचा प्रवेश होणार आहे. विक्रीस काढलेले भाग लक्षावधि नागरिकांत वांटलें गेल्या कारणानें, फोर्ड कुटुंबाची कंपनीवरील सत्ता कमी होण्याचा मुळींच संभव नाहीं.

शेअर-विक्री अंडरराइट करण्याचें काम सात मोठ्या कंपन्यांना मिळेल, व ५०० फर्म्सच्या मार्फत त्यांची विक्री केली जाईल. लहान लहान असामींनाहि हे शेअर मिळावेत, अशी योजना मुद्दामच करण्यांत आली आहे. कंपनीनें १९५५ च्या पहिल्या नऊ महिन्यांत जेवढा नफा मिळविला, तेवढा नफा कंपनीच्या ह्यापूर्वी कोणत्याहि वर्षी बारा महिन्यांतहि मिळालेला नव्हता. सबंद १९५५ चा नफा हा दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या २१ वर्षांच्या नफ्याच्या बेरजेपेक्षाहि अधिक भरेल! म्हणजे, १९५५ च्या नफ्याची रक्कम सुमारें १७५ कोटी रुपये होईल. निव्वळ नफ्याच्या दहापट शेअरची किंमत साधारणतः धरली जाते, ह्या साध्या हिशेबानें शेअरविक्रीमुळें सुमारें २५० कोटी रुपये वाढावा मिळेल. शेअरची बाजारांतील किंमत एकसारखी वाढत राहावी, ह्या दृष्टीनेंच त्याच्या विक्रीची किंमत ठेवली जाईल. हे २५० कोटी रुपये फोर्ड फौंडेशनच्या द्वारां शैक्षणिक व इतर कार्याला मिळणार आहेत.

---

## हिंदुस्थान आणि सोविएत युनियन यांच्यांतील आर्थिक सहकार्य

### संयुक्त हिंद-सोविएत पत्रक

सोविएत युनियनच्या मंत्रिमंडळ-समितीचे प्रमुख एन. ए. बुल्गानिन, सोविएत युनियनच्या सर्वोच्च अध्यक्षमंडळाचे सदस्य एन्. एस. क्रुश्चेव आणि हिंदुस्थानचे पंतप्रधान श्री. जवाहरलाल नेहरू यांनीं काढलेल्या संयुक्त पत्रकांत आर्थिक सहकार्य व व्यापारी संबंध वाढविण्याच्या उभय देशांच्या आकांक्षेचा निर्देश करण्यांत आलेला आहे. या बाबतींत हिंदुस्थान सरकारचे व सोविएत सरकारचे प्रतिनिधी यांच्यांत प्राथमिक चर्चा झाली आहे आणि त्यांचें असें मत आहे कीं शक्य तितक्या अधिक प्रमाणांत उभय देशांतील व्यापाराची वाढ करणें परस्पर फायद्याचें ठरेल. या दिशेनें पहिलें पाऊल म्हणून पुढीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे.

१. (अ) १९५६ पासून पुढील तीन वर्षांच्या काळांत सोविएत युनियन हिंदुस्थानला दहा लाख टन पोलाद पुरवील आणि हिंदुस्थान तें विकत घेईल. पहिल्या वर्षी तीन लाख टन आणि पुढील दोन वर्षांत दरसाल साडेतीन लाख टन याप्रमाणें हें पोलाद पुरविण्यांत येईल. पुरवठ्यासंबंधींच्या अटी व शर्ती मागाहून वाटाघाटी करून ठरविण्यांत येतील.

(ब) या तीन वर्षांच्या काळांत सोविएत युनियन हिंदुस्थानला तेलाचें उत्पादन, खाणधंदा यासाठीं यंत्रें व उभय पक्षांत ठरेल त्याप्रमाणें इतर सामुग्री व माल विकत देईल. हा माल विकत देण्यासंबंधींच्या अटी व शर्ती मागाहून वाटाघाटी करून ठरविण्यांत येतील.

(क) सोविएत युनियन हिंदुस्थानांतील कच्च्या मालाची व तयार मालाची आपली खरेदी बऱ्याच प्रमाणांत वाढवील, तत्संबंधींच्या अटी व शर्ती उभय पक्षांत वाटाघाटीनें मागाहून ठरविल्या जातील. अशी आशा करण्यांत येत आहे कीं या खरेदीची एकंदर रक्कम हिंदुस्थानांतील सोविएत सरकारी संस्थांच्या खर्चाच्या रकमेसह हिंदुस्थान सोविएत युनियनकडून घेणाऱ्या मालाच्या एकंदर रकमेइतकी होईल.

(ड) हिंद-सोविएत युनियन व्यापारी करारांत नमूद केल्याप्रमाणें मालाच्या आयाती-निर्यातीसाठीं उभय सरकारें आपले कायदे, नियम व निर्बंध यानुसार जास्तींत जास्त सवलती देतील व शक्य तें सर्व साह्य करतील.

२. व्यापारांत वाढ होणार हें ध्यानांत घेतां आणि जहाजांच्या वाहतुकीची पुरेशी सोय करण्यासाठीं उभय सरकारांना असें वाटतें कीं, हिंदस्थान आणि सोविएत युनियनच्या बंदरांत नियमितपणें हिंदी व सोविएत जहाजांची वाहतूक सुरू करणें जरूर आहे.

३. उभय सरकारांच्या प्रतिनिधींनीं असेंहि मान्य केलें आहे कीं वरील ठराव अंमलांत आणण्यासाठीं करार करण्यासाठीं अटी व शर्ती यासंबंधीं चर्चा करण्यासाठीं हिंदुस्थानांतून सोविएत युनियनमध्यें आणि / किंवा सोविएत युनियनमधून हिंदुस्थानांत शिष्टमंडळें शक्य तितक्या लवकर पाठविण्यांत यावीत.

---

**अल्पबचतीच्या मोहिमेचें यश**—चालू फडणिशी वर्षांत अल्पबचत योजनेच्या प्रचारामुळें ६० कोटी रुपये जमा होतील असा अंदाज करण्यांत आला आहे. गेल्या वर्षी ५४ कोटी रुपये जमा झाले होते. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत ह्या मोहिमेला आलेलें यश उत्साहवर्धक असलें, तरी अधिक जोमानें प्रचार करण्याची जरूरी वाटत आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधींत १०० कोटी रुपयांचें उद्दिष्ट नियोजन-समितीतर्फे ठेवण्यांत आलें आहे.

## सहकारी सोसायट्यांचे कायद्याखालील लवाद-कोर्टांचें अधिकारक्षेत्र

(श्री. स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल. बी.)

१९२५ च्या मुंबई सहकारी सोसायट्यांच्या कायद्यान्वयें कलम ५४ यांत नमूद केलेप्रमाणें वाद अगर तंटा निर्माण झाल्यास त्या वादाचा अगर तंट्याचा निर्णय कोणत्या न्यायालयांत व्हावयाचा. ह्याबाबतची तरतूद सदरच्या ५४ व्या कलमांत केलेली आहे. कलम ५४ मध्यें नमूद केलेल्या कोर्टास "लवाद कोर्ट" अशी संज्ञा आहे व ह्या कोर्टाचें अधिकारक्षेत्रहि कायदेमंडळानें ठरवून टाकलेलें आहे. कलम ५४ यांत नमूद केलेल्या वादाव्यतिरिक्त इतर वादांचा अगर तक्रारींचा निर्णय देणेचा अधिकार सदरचे लवाद कोर्टास नाहीं. कलम ५४ यांत असें नमूद केलें आहे कीं, सहकारी सोसायटीच्या घटनेसंबंधीं अगर व्यवहारासंबंधीं सभासद अगर त्यांच्या करवीं हक्क प्रस्थापित करणारे इसम अगर सभासद, पूर्वी असलेले सभासद अगर त्यांच्या करवीं हक्क सांगणारे आणि सोसायटीचे पदाधिकारी, एजंट अगर सेवकवर्ग (चालू अगर निवृत्त,) अगर सोसायटी व तिची समिति, आणि सोसायटीचा कोणीहि पदाधिकारी, एजंट, सभासद अगर सेवक (चालू अगर निवृत्त) ह्यांचेमध्यें कांहीं तंटा अगर वाद निर्माण झाल्यास, अशा स्वरूपाच्या वादाचा निर्णय मे. रजिस्ट्रार कोऑपरेटिव्ह सोसायटीज अगर त्यांनीं नेमलेल्या लवादामार्फत अगर संबंधी पक्षकारांनीं लवाद बोर्डाची मागणी केल्यास अशा लवाद बोर्डाकडून व्हावयाचा असतो. (सदरचें मूळ कलम इंग्रजींत असून स्थूलमानानें त्याचा मराठींत अनुवाद केलेला आहे.)

लवादकोर्टाचें अधिकारक्षेत्र अशा रीतीनें मर्यादित केलेलें असून सदरच्या अधिकारक्षेत्राबाहेरील तंट्याचा अगर वादाचा निर्णय एकाद्या लवाद कोर्टानें दिल्यास तो निर्णय संबंधी पक्षकारांवर बंधनकारक होत नाहीं. कलम ५४ च्या उत्तरार्धांत असेंहि नमूद केलें आहे कीं पक्षकार व सोसायटी ह्यांचे दरम्यान अगर हक्कदारांचे दरम्यान एकाद्या वादग्रस्त मुद्यावर गुंतागुंतीचे कांहीं कायदेशीर प्रश्न उपस्थित झाल्यास मे. रजिस्ट्रारसाहेब यांना जरूर वाटल्यास सदरच्या दाव्याची चौकशी तात्पुरती स्थगित करून संबंधी पक्षकारांस अगर सोसायटीस सदरच्या वादग्रस्त प्रश्नांचा निकाल दिवाणी कोर्टामार्फत करून घेतां येईल. मात्र असा दावा मे. रजिस्ट्रारसाहेब यांनीं सदरच्या दाव्याची चौकशी स्थगित केलेल्या हुकमाच्या तारखेपासून सहा महिन्यांचे आंत दाखल करावयास पाहिजे; नाहींतर मे. रजिस्ट्रार हे सदरच्या कलमांतील प्याराग्राफ १ मध्यें उल्लेख केलेप्रमाणें पुढील काम चालू करतील.

वरील विवेचनावरून असें स्पष्ट आहे कीं, नॉमिनीकडे निर्णयासाठी पाठवलेल्या दाव्यांचा अगर वादाचा निर्णय करतांना सदरच्या नॉमिनीस अगर लवाद बोर्डास अशा दाव्यांचा निर्णय करणें त्यांचे अधिकारक्षेत्रांत येतें किंवा कसें ह्याचा प्रामुख्यानें विचार करावा लागतो. एकादा दावा निर्णयासाठी नॉमिनीकडे मे. असिस्टंट रजिस्ट्रार को. सो. यांचेकडोन आलेला आहे म्हणून नॉमिनीस सदरच्या दाव्याचें काम चालवून निर्णय देणेचा अधिकार आहे असा समज नॉमिनीनें अगर लवाद न्यायमंडळाचे सदस्यांनीं करून घेणें कायदेशीर होणार नाहीं. एकाद्या नॉमिनीनें अगर लवाद बोर्डानें त्याचे अधिकारक्षेत्राबाहेरील वादाचा निर्णय लावणेचा आग्रह धरून दाव्याचें कामकाज चालवल्यास त्याबाबत संबंधी पक्षकारांना दिवाणी कोर्टाकडे धांव घेऊन मनाईहुकूम आणून दिवाणी कोर्टाचे हुकुमान्वयें दाव्याचें काम स्थगित करून घेतां येईल; अगर दाव्याचा संपूर्ण निर्णय झाल्यावर त्याबाबत कोऑपरेटिव्ह ट्रायब्युनल अगर नामदार हायकोर्टांत सदरच्या नॉमिनीस अगर लवाद मंडळास दावा चालवणेचा अधिकार नव्हता ह्याबाबत हुकूम मिळवून घेतां येईल; आणि म्हणून लवादमंडळास लवाद दाव्याचा निर्णय करणेपूर्वी सदरच्या वादाचा अगर तक्रारीचा निर्णय देणें त्यांच्या अधिकारक्षेत्रांत येतें किंवा कसें हें ठरविणें महत्त्वाचें आहे. कोर्टाचे अधिकारक्षेत्राबाबत निर्माण होणाऱ्या मूलभूत प्रश्नांचा सांगोपांग विचार प्रथमतः न झाल्यास, नॉमिनीनें अगर लवाद मंडळानें दिलेले निर्णय वरील कोर्टांत फिरण्याची शक्यता असलेमुळें अशा मूलभूत प्रश्नांचे विचारांना अग्रेसरत्व देणें हें क्रमप्राप्तच आहे. आणि म्हणून संबंधी पक्षकारांनीं अशा मूलभूत प्रश्नांचे विचाराबाबत जागरूक राहाणें अगत्याचें आहे.

---

### नव्या कंपन्यांची स्थापना

चालू आर्थिक वर्षाच्या सप्टेंबर अखेर संपलेल्या सहा महिन्यांत भारतांत ६८० नव्या कंपन्यांची स्थापना करण्यांत आली अशी माहिती अर्थखात्याच्या कंपनी-कायद्याच्या खात्यानें आपल्या अहवालांत प्रसिद्ध केली आहे. ह्या कंपन्यांचें अधिकृत भांडवल ६७·६ कोटी रुपये आहे. ६८० कंपन्यांपैकीं ५८५ कंपन्या खाजगी असून ९५ सार्वजनिक भांडवलाच्या आहेत. सप्टेंबर महिन्यांत १५·३ कोटी रुपये अधिकृत भांडवल असलेल्या १०२ नव्या कंपन्यांची नोंद करण्यांत आली. उद्योगधंद्यांच्या प्रकाराच्या दृष्टीनें विचार करतां १५·४ कोटी रुपये अधिकृत भांडवल असलेल्या २५८ कंपन्या व्यापारी स्वरूपाच्या आहेत आणि ४१·५ कोटी रुपये अधिकृत भांडवल असलेल्या २४१ कंपन्या कारखानदारी स्वरूपाच्या आहेत. मुंबई, मद्रास व पश्चिम बंगाल ह्या राज्यांत अनुक्रमें १२९, ७४ व २७५ नव्या कंपन्या स्थापन करण्यांत आल्या. त्यांचें अधिकृत भांडवल अनुक्रमें २८·१ कोटी, ५·१ कोटी व ७·५ कोटी रुपये आहे. १९५५ च्या सप्टेंबर अखेर संपलेल्या सहा महिन्यांत ३७० कंपन्यांचा कारभार गुंडाळण्यांत आला. त्या सर्वांचें मिळून वसूल भांडवल ४·२ कोटी रुपये होतें. ११७ सार्वजनिक भांडवलाच्या कंपन्या व २५३ खाजगी भांडवलाच्या कंपन्या ह्या काळांत बंद करण्यांत आल्या. नव्यानें स्थापन करण्यांत आलेल्या खाजगी व सार्वजनिक कंपन्या व पूर्वी असलेल्या कंपन्या ह्यांनीं मिळून २५ कोटी रुपयांचें वसूल भांडवल गोळा केलें. त्यापैकीं २१·५ कोटी रुपये म्हणजे ८५ टक्के भांडवल सार्वजनिक कंपन्यांनीं जमविलें; नव्यानें नोंद करण्यांत आलेल्या कंपन्यांनीं ह्या सहामाहीच्या कालांत ६१ लाख रुपयांचें वसूल भांडवल गोळा केलें.

---

### चार्टर्ड बँकेचा उपक्रम

चार्टर्ड बँकेनें आग्नेयी आशियांतील उद्योगधंद्यांना मध्यम मुदतीचीं कर्जें देण्याचा व्यवहार करण्यासाठी एक डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन स्थापलें आहे. ब्रिटिश बँकांनीं हा व्यवहार करण्यास प्रारंभ करणें, त्याचप्रमाणें एक्सचेंज बँकेनें फॉरिन एक्सचेंज व्यतिरिक्त इतर बँकिंगमध्यें प्रवेश करणें, ह्या दोन्ही गोष्टी मोठ्या सूचक आहेत. त्यांत नवीन कांहीं नसलें, तरी आणून-बुजून, योजनापूर्वक पाऊल टाकण्याचें महत्त्व विशेष आहे.

## छोट्या उद्योगधंद्यांचें दुसऱ्या योजनेंतील स्थान

### प्रा. ध. रा. गाडगीळ ह्यांचे विचार

सामान्यपणें अशी समजूत प्रचलित आहे कीं छोट्या उद्योगधंद्यांना पाठिंबा देणारे लोक स्वयंपूर्ण ग्रामीण आर्थिक जीवन आणि अगतिमान उत्पादनतंत्र ह्या गोष्टींना अनकूल असतात. पण तसें नाहीं. ज्या उत्पादन-शाखांत आधींच खूप लोक काम करीत आहेत अशा परंपरागत ग्रामोद्योगांत व छोट्या उद्योगधंद्यांत सुधारलेलें उत्पादनतंत्र सर्रास अंमलांत आणूं नये अशी त्यांची भूमिका आहे. छोट्या उद्योगधंद्यांच्या नजीकच्या भवितव्याचा आराखडा ठरवितांना तीन गोष्टी नजरेसमोर ठेवण्यांत आल्या पाहिजेत. ( १ ) रोजगार निर्माण करण्याची आवश्यकता, ( २ ) रोजखपाच्या वस्तूंच्या वाढत्या उत्पादनाची जरूरी आणि ( ३ ) उत्पादनाची कार्यक्षमता एकसारखी वाढवीत रहाण्यासाठीं घ्यावयाची दक्षता. आपल्या देशांत आज बेकारी व अर्धवेकारी दोन्ही आढळून येतात. शिवाय लोकसंख्येच्या नैसर्गिक वाढीमुळें दरसाल १५ लाख नव्या लोकांची भर रोजगार शोधणाऱ्यांच्या संख्येंत पडत असते. त्यामुळें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस बेकारी व अर्धवेकारी ह्यांच्या बाबतींत फरक पडणार नाहीं. तेव्हां निदान ही परिस्थिति आहे त्यापेक्षा अधिक बिघडूं नये, अशा प्रकारच्या आर्थिक धोरणाची आवश्यकता आहे.

सध्यां अस्तित्वांत असलेल्या प्रमुख, छोट्या व ग्रामोद्योगां-कडून रोजखपाच्या वस्तूंचा वाढता पुरवठा होऊं शकेल. त्यासाठी कायम भांडवलाची, अधिक कामगारांची अगर त्यांना शिक्षण देऊन तयार करण्याची गरज नाहीं. फक्त अधिक खेळत्या भांडवलाची जरूरी आहे. कायम स्वरूपाच्या भांडवलापेक्षा खेळत्या भांडवलाची सोय करणें अधिक सुलभतेनें करतां येणें शक्य आहे. म्हणून सध्यां अस्तित्वांत असलेल्या ग्रामोद्योगां-कडन पूर्ण उत्पादन करून घ्यावें हा मार्ग उघडच होतो. त्यामुळें सध्यां काम करीत असलेल्यांना पूर्ण रोजगारहि मिळेल. ह्या पद्धतीनें काम करावयाचें झाल्यास मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या यांत्रिक उद्योगधंद्यांवर कांहीं काल बंधनें घालावीं लागतील अगर त्यांच्या उत्पादनावर कर घ्यावा लागेल. छोट्या व ग्रामोद्योगांची संपूर्ण उत्पादनक्षमता कामीं लावल्यावर त्याहून अधिक लागणाऱ्या उत्पादनासाठीं मात्र आणखी भांडवल व अधिक श्रमशक्ति ह्यांची गरज लागेल. ही स्थिति प्राप्त झाल्यावर अधिक भांडवलाची व श्रमशक्तींची गुंतवणूक अद्यावत् पद्धतीच्या उत्पादन पद्धतींत करावयाची कीं ग्रामोद्योगांत करावयाची हा प्रश्न उपस्थित होईल. ह्यांतून एकच मध्यम मार्ग अनुसरतां येण्यासारखा आहे. उत्पादनाचें तंत्र हळू-हळू सुधारेल अशा बेतानेंच नवीन भांडवलाची गुंतवणूक व नव्या रोजगारांची निर्मिति करण्यांत आली पाहिजे. जुन्या उत्पादन तंत्राऐवजीं नवें अद्यावत् उत्पादनतंत्र एकदम वापरल्यास बेकारीचा प्रश्न उपस्थित होईल.

भावी काळांतील छोट्या उद्योगधंद्यांचें क्षेत्र व पद्धती हीं दोन्ही विकेंद्रीकरणासंबंधीं जें धोरण स्वीकारण्यांत येईल त्यावर अवलंबून आहेत. औद्योगीकरण करण्याचे दोन मार्ग आहेत. त्यापैकी एकाचाच स्वीकार करतां येईल. जगाच्या इतिहासाकडे पाहिलें तर औद्योगिकरणाचीं कांहीं वैशिष्ट्यें दिसून येतात. उत्पादनाच्या घटकाचा एकसारखा होत जाणारा विस्तार, पत, वाहतूक आणि इतर आवश्यक बाबींचें केंद्रीकरण आणि कांहीं भरमसाठ वाढलेल्या शहरांतून आर्थिक शक्तीचें केंद्रीकरण हीं तीं वैशिष्ट्यें होत. अविकसित देशांतून वरील गोष्टींबरोबरच ग्रामीण भागांतील दारिद्र्याची वाढ आणि जुन्या समाजरचनेची ढांसळण ह्याहि घटना दिसून येतात. सामाजिक विचारवंतांपैकी सर्वांनीं ह्या भयप्रद घटनांचा व त्यामुळें द्याव्या लागणाऱ्या मोलाचा धिक्कार केलेला आहे. पण त्याचबरोबर एक मुद्दा आपण लक्षांत घेतला पाहिजे. विकेंद्रित समाजाची उभारणी करण्यासाठी औद्योगिक विकासाच्या सहजक्रमाला मुद्दाम वळण लावण्याचा प्रयोग अजून एकाहि देशानें केलेला नाहीं. उद्योगधंद्यांचें विकेंद्रीकरण ह्याचा अर्थ खेडेगांवाची आर्थिक, स्वयंपूर्णता अगर मागासलेलें उत्पादनतंत्र असाच केला पाहिजे असें नाहीं. उलट छोट्या उद्योगधंद्यांच्या उत्पादनतंत्रांत व इतर तांत्रिक बाबतींत सुधारणा करणें, नवीन कल्पना अंमलांत आणणें आणि जरूर पडल्यास लोकसंख्येची योजनापूर्वक पांगापांग करणें ह्या गोष्टींचा अंतर्भाव विकेंद्रीकरणामध्यें खासच होतो. हा मार्ग अनुसरण्यांत आला तर देशाचें औद्योगिकरण करतांना, खेडेगांवांतील दरिद्री जनतेला गजबजलेल्या मोठ्या शहरांतून रोजगार मिळविण्यासाठी हिंडविण्याची गरज भासणार नाहीं. ग्रामीण उद्योगधंद्यांच्या सध्याच्या स्वरूपांत योजनापूर्वक बदल घडवून आणून औद्योगी-करण साधतां येईल.

---

**राज्य-सरकारांची करवाढ ?**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत राज्य सरकारांना आणखी २५५ कोटी रुपयांची करवाढ करावी लागेल, असें समजतें. करचौकशीसमितीच्या शिफारशींना अनुसरून १६० कोटी रुपयांची रक्कम नवीन करवाढीनें उभारण्याचें राज्य-सरकारांनीं पूर्वींच मान्य केलें आहे.

WILCO

तेजी असो वा मंदी असो

वेस्टर्नचा विमा

म्हणजे

अल्प हप्त्यांत मोठ्या रकमेच्या विम्याचें संरक्षण.

सर्वांस उपयुक्त अशा विविध व आकर्षक

विमा योजनांसाठी

आजच भेटा अगर लिहा.

वेस्टर्न इंडिया

विमा कंपनी लिमिटेड, सातारा.

पुणें शाखा :—वेस्टर्न इंडिया हाऊस, लक्ष्मी रस्ता, पुणें २.

—फोन नं. ३४०१—

**मोठ्या शहरांतील भिकारी**—म्युनिसिपल कॉर्पोरेशन्स व इतर स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांच्या हद्दींत भिकाऱ्यांसंबंधीचा कायदा मुंबई सरकार पुढील आर्थिक वर्षांत अधिक कडक रीतीनें अंमलांत आणील, असा संभव आहे. अहमदाबाद म्युनिसिपालिटीनें १९५६–५७ सालांत भिकाऱ्यांच्यासाठी एक आश्रय-स्थान बांधण्याचें ठरविलें आहे. इमारतीसाठी ७०,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत.

**विमान-वहातुक नोकरांसाठी बिऱ्हाडें**—एअर इंडिआ इंटरनॅशनल व इंडिअन एअर लाईन्स कॉर्पोरेशन ह्यांच्या नोकरवर्गासाठी बांधण्यांत यावयाच्या बिऱ्हाडांच्या इमारतीचा पायाचा दगड बसविण्यांत आला. इमारत पुढील वर्षांत पुरी होईल, व तीसाठीं दोन्ही कॉर्पोरेशन्स मिळून ६५.५० लाख रुपये खर्च करतील. ६०० बिऱ्हाडांची सोय करण्यांत येणार आहे. वसाहतींत बँक, पोस्ट ऑफिस, शाळा, दवाखाना, इत्यादि सोयी करण्यांत येतील.

**इलेक्ट्रॉनिक्स उपकरणाचा कारखाना**— भारतीय सरकारच्या संरक्षण खात्याच्या नियंत्रणाखालीं असलेला इलेक्ट्रॉनिक्स उपकरणें तयार करण्याचा कारखाना नुकतांच चालू झाला. कारखाना उभारण्यासाठीं १०२ कोटी रुपयांचें भांडवल लागलें. मध्यवर्ती व राज्य सरकारांच्या गरजा भागविण्यासाठीं तो मुख्यतः उभारण्यांत आला असला, तरी कांहीं वर्षांत शेजारी राष्ट्रांनाहि माल निर्यात करूं शकेल. कारखाना बंगलोरपासून ८ मैलांवर आहे.

**दख्खनच्या पठारावरील प्राचीन मानव**—नर्मदा नदीपासून तुंगभद्रा नदीपर्यंतच्या दख्खनच्या पठारावर प्राचीन इतिहास साधनांविषयीं गेल्या कांहीं वर्षांत बऱ्याच ठिकाणीं उत्खनन करण्यांत आलें आहे. ह्या भागांत खिस्त शकापूर्वी २०,००० वर्षे अश्मयुगांतील मनुष्य वावरत होता असें आतां सिद्ध झालें आहे. ह्या भागांत आर्यांच्या वसाहती खिस्त शकापूर्वी ४,००० ते ३,००० वर्षांपूर्वी झालेल्या असाव्या. आर्यांना लोखंडाचा उपयोग त्या शकापूर्वी १,२०० वर्षांपासून झाला असावा.

**सहकारी बँकेची स्थापना**—ठाणे जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष श्री. एच. जी. वर्तक ह्यांच्या पुरस्कारानें जिल्ह्यांत एक मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करण्यांत येणार आहे. बँकेचें प्राथमिक भांडवल २,००,००० रुपयांचें असेल. शेतकऱ्यांशीं संबंधित असणाऱ्या संस्थांना बँक कर्जे देण्याची व्यवस्था करील.

**म्हैसूर राज्यांत विजेचा अपुरा पुरवठा**—म्हैसूर राज्यांत सध्यां विजेचा पुरवठा अपुरा भासत आहे. दिव्यांना लागणारी वीजच फक्त पुरविण्याचें घाटत आहे. बंगलोर मधील कारखान्यांना लागणाऱ्या विजेच्या गरजेंत वाढ झाल्यामुळें हा तुटवडा पडला आहे. कारखान्यांना सुद्धां अगदीं जरूर तेवढाच वीज पुरविण्यांत येणार आहे.


## पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

१११ भवानी पेठ, पुणें २.

**खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो.**

* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी-विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५
तार–SANCOSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी
मॅनेजर

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २. ( टे. नं. २७६३ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.
टे. नं. २६०७

## भोगावती सहकारी कारखान्याची पहिली सभा

'सहकारी पद्धतीवर साखरकारखाने काढण्याची योजना मुंबई राज्य सरकारनें आंखली आहे, ती शेतकऱ्यांच्या हितासाठी आहे. शेतकऱ्यांनीं पिकविलेल्या कच्च्या मालाचें रूपांतर पक्क्या मालांत करून तो विकला तर नफ्याचें प्रमाण त्यांना अधिक राहील व दरांतील अनिश्चिततेमुळें होणारें त्यांचें नुकसान टळेल जर सहकारी पद्धतीवर साखर कारखाने काढण्याची योजना पुढें आली नसती तर देशांतील साखरेची तूट भरून काढण्यासाठी व्यक्तीगत भांडवलाचे कारखाने निघाले असते आणि शेतकऱ्यांना स्वतःच्या जमिनी त्या कारखान्यांना दीर्घ मुदतीच्या करारानें खंडानें याव्या लागून किंवा विकाव्या लागून त्यांच्या नशिबीं शेतमजूर होण्याचें दुर्भाग्य आलें असतें' असे उद्गार मुंबई राज्य सहकारी बँकेचे ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वर्दे यांनीं धी भोगावती सहकारी साखर कारखाना लि. या संस्थेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षपदावरून भाषण करतांना काढले.

साखर कारखान्याचे चीफ प्रमोटर श्री. दादासाहेब पाटील कौलवकर यांनीं आजवर झालेल्या कार्याची माहिती निवेदन केली:—

कारखान्यास साधारणपणें रु. ८० लाख भांडवलाची जरूरी आहे व तें खालीलप्रमाणें उभारण्याचें ठरलें:—

| | |
|---|---|
| (१) उत्पादक सभासदांचें शेअर भांडवल | रु. २० लाख |
| (२) मुंबई राज्य सरकारकडून शेअर भांडवल | रु. १० लाख |
| (३) इतर सभासदांकडून शेअर भांडवल | रु. ५ लाख |
| (४) फायनान्स कॉर्पोरेशनचें कर्ज | रु. ४५ लाख |
| एकूण | रु. ८० लाख |

कारखान्यास लागणारा ३,००० ते ३,५०० एकर ऊंस साधारणपणें ५ ते १० मैलांच्या त्रिज्येंत असावा या दृष्टीनें कारखान्याचें कार्यक्षेत्र कांडगांव पासून कसबा तारळे या गांवापर्यंत भोगावतीचे दोन्ही बाजूस ठरविण्यांत आलें. शेअरची किंमत रु. १,००० असून दर एकरी उत्पादक सभासदानें १ शेअर घ्यावयाचा असून त्यापैकीं रु. ७५० तीन हप्त्यांनीं वसूल करण्याचें ठरलें. पहिला हप्ता रु. ३००, दुसरा हप्ता रु. २०० व तिसरा हप्ता रु. २५०. कारखाना रजिस्टर होण्यास रु. ५ लाख शेअर भांडवलाची जरूरी असलेनें तावडतोब शेअर भांडवल जमविण्याचे कामास सुरवात झाली. पण मुंबई राज्य सहकारी बँकेच्या मदतीशिवाय आम्हीं रु. १ लाख शेअर भांडवल जमविण्यापलीकडे जाऊं शकलों नाहीं, सभासदांची इच्छा असूनहि मंदीमुळें फारशी प्रगति झाली नाहीं. म्हणून ही सर्व परिस्थिति आम्ही बँकेचे वरिष्ठ अधिकारी व मॅनेजर श्री. गायतोंडे यांचेपुढें मांडली. त्यांनीं आपल्या भागाची पहाणी करून व सर्व कार्यकर्त्यांशीं चर्चा करून साखर कारखाना उभारणेसाठीं जरूर ती मदत व मार्गदर्शन केल्यामुळेंच कारखाना रजिस्टर होण्यास लागणारें भांडवल जमा करूं शकलों.

रजिस्ट्रेशन प्रपोजल पाठविलें तरी शेअर जमा करण्याचें काम चालूं होतेंच. मुंबई राज्य सरकारकडून रु. १० लाख शेअर भांडवल मिळण्याकरितां आपल्या कारखान्याचें शेअर भांडवल रु. ५ लाख जमविणें आवश्यक आहे. ता. १८-१०-१९५५ रोजीं आपला कारखाना रजिस्टर झाला व आपण पाठविलेले पोटनियम कांहीं दुरुस्त्यांसह मंजूर होऊन आले. कारखान्याचे कार्यक्षेत्रांत करवीर व राधानगरी तालुक्यांतील एकूण ३६ गांवांचा समावेश केला असून १३६० ऊंसकरी शेतकरी या कारखान्यांत आलेले आहेत. कारखान्याचे कार्यक्षेत्रांत अजमासें ४,००० ते ४,५०० एकर ऊंस आहे. त्याचमुळें आपला कारखाना १२० दिवस चालूं राहील.

कारखान्याचे नोव्हेंबरअखेर एकूण रु. ७,०५,३५० चें शेअर भांडवल झालें असून आणखी जरूर तें शेअर भांडवल जमविण्याचे प्रयत्न कार्यकर्ते करीत आहेत. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची नेमणूक होईपर्यंत कारखान्याचें काम करण्याचे अधिकार चीफ प्रमोटर ह्यांना देण्यांत आले आहेत.

### स्टॉकएक्सचेंजच्या यादींतील कंपन्या

नवा कंपनी कायदा लवकरच अंमलांत येईल. त्याला अनुलक्षून बॉंबे स्टॉकएक्सचेंजनें आपले नियम मिळते केले आहेत. 'लीन' ची बाब सोडली, तर बाकी कोणत्याच बाबतींत नव्या कायद्यानें नवीं बंधनें येणार नाहींत. पूर्ण भरणा केलेल्या शेअर्सवर कंपनीनें 'लीन' ठेवलेला नसेल, पूर्ण भरणा न झालेल्या शेअर्सवरील 'लीन' येणें त्या रकमेपुरताच असेल, आणि शेअर्सच्य वर्गा-वर्गीवर नियंत्रण नसेल, तर कंपन्यांनीं आपलीं आर्टिकल्स बदलण्याचें कारण नाहीं, असें स्टॉकएक्सचेंजनें जाहीर केलें आहे. स्टॉकएक्सचेंजच्या यादींत येऊं व राहूं इच्छिणाऱ्या कंपन्यांची फी १ जानेवारी, १९५६ पासून खालीलप्रमाणें राहील :—

| | रु. |
|---|---|
| प्रवेश फी | १,००० |
| वार्षिक फी | |
| 'फॉरवर्ड' यादींतील कंपन्या— | २,००० |
| इतर कंपन्या — | |
| २५ लाखांखालील वसूल भांडवल | २५० |
| २५ ते ५० लाख | ५०० |
| ५० लाख ते ५ कोटी | १,००० |
| ५ कोटींवर | २,००० |

### आंबे भरपूर मिळणार

रत्नागिरी जिल्ह्यांत आंब्याच्या झाडांना भरपूर मोहोर आला असून, यंदा आंब्यांचें पीक चांगलें येईल, अशी अपेक्षा आहे.

### कोयनेची वीज

कोयनेची वीज ऑक्टोबर, १९६० मध्यें उपलब्ध होईल, असा आजचा अंदाज आहे.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### स्टेट बँकांचें विलिनीकरण

कांहीं स्टेट बँका स्टेट बँक ऑफ इंडियामध्यें सामील करून घेण्याविषयीं सरकारचा विचारविनिमय अद्याप चालू आहे. हैद्राबाद स्टेट बँक, बँक ऑफ म्हैसूर आणि बँक ऑफ बिकानेर ह्यांचेसंबंधीं रिझर्व्ह बँकेनें आपला अहवाल सरकारकडे पाठविलेला आहे. वेगवेगळया राज्य सरकारांनीं त्यांचे राज्यांतील स्टेट बकांच्या विलिनीकरणास मान्यता दर्शविलेली आहे. पण स्टेट बकांना मात्र स्वतंत्र अस्तित्वच हवें आहे.

### मंतरलेल्या नारळाला ३१ रुपये

अर्णाकुलम् येथें स्थानिक तामिळ संघानें रामायणावरतीं १५ दिवस पारायणें करविलीं. अखेरच्या दिवशीं एका तामिळ पंडितानें जाहीर केलें, कीं त्याचेजवळ एक मंतरलेला नारळ आहे; संतति नसणारांचें ईप्सित तो घडवून आणतो. ह्या नारळाचा लिलाव करण्यांत आला, तेव्हां त्याला ३१ रुपये किंमत आली. अपत्य नसणाऱ्या एका चेट्टीनें तो नारळ विकत घेतला.

### श्री. बुल्गॅनिन ह्यांना गंगेचें पाणी

हरिद्वार येथील एका कवीनें रशियाचे पंतप्रधान श्री. बुल्गॅनिन ह्यांना एका सुशोभित पात्रांत गंगेचें पाणी नजर केलें. ह्या पाण्याचें रशियांत शास्त्रीय दृष्ट्या परीक्षण करण्यांत यावें व त्याचा अहवाल जगाच्या हितासाठीं प्रसिद्ध करण्यांत यावा, अशी त्यानें श्री. बुल्गॅनिन ह्यांना विनंती केली आहे.

### ब्रिटिश युद्धसाहित्याची उघड, पण 'चोरटी' निर्यात

ब्रिटिश रणगाडे व रणसाहित्य इजिप्तसारख्या देशांकडे कसें निर्गत होतें, ह्याची हकीकत उद्बोधक आहे. अशा निर्गतीस वास्तविक सरकारची बंदी आहे. पण, 'टाकाऊ' साहित्य कचरा म्हणून विकलें जातें; व्यापारी ते विकत घेतात आणि बेल्जममध्यें पाठवितात. येथें तें साहित्य 'दुरुस्त' करण्यांत येऊन खरेदीदार देशांकडे पाठविण्यांत येतें. इजिप्तनें ग्रेट ब्रिटनकडून व्हॅलेंटाइन टँक्स ह्याच पद्धतीनें मिळविलीं. आणखी १५० टँक्स अँटवर्पमध्यें गोदींत वहातुकीची वाट पाहात आहेत. अशा चोरट्या निर्गतीच्या मार्गांत कायदेशीर अडचणी आहेत, असें ब्रिटिश सरकार म्हणतें !

### यु. नेशन्सची बैठक रोममध्यें भरण्याची शक्यता

१९५६ मध्यें अमेरिकेंत अध्यक्षाच्या निवडणुकीची गडबड असल्याकारणानें, युनायटेड नेशन्सच्या असेंब्लीची नेहमीची बैठक निवडणूक संपल्यावर भरवावी लागेल; म्हणजे ती मार्च, १९५७ पर्यंत लांबेल. म्हणून, ही बैठक इटलींत रोम येथें भरविण्याविषयीं वाटाघाटी चालू आहेत. बहुसंख्य सभासदांनीं रोममध्यें बैठक भरविण्यास संमति दिली, तर इटली त्याबद्दल आमंत्रण पाठवील. यु. नेशन्सचे सेक्रेटरी जनरल लवकरच यु. नेशन्सच्या ७६ सभासद-राष्ट्रांचा अभिप्राय विचारतील.

### इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्सचे सभासद

इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्सच्या मुंबई केंद्राचे सभासद १९५४-५५ मध्यें २८.५% वाढून त्यांची संख्या २,७६१ झाली.


अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले,
लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या
जेवणांत गोडी वाढते
व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—गुरुभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— ह. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी
महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी !!

दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ
इन्शुअरन्स कं. लि.

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७
हयातीनंतरच्या विम्यास : ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

विमान, आगबोट, रेल्वे, मोटार, आदि वाहनानें
केलेले विविध प्रवास, यात्रा व क्षेत्रांचीं
वर्णनें, प्रवासांत येणाऱ्या अडचणी,
तक्रारी व त्यांचें निरसन यांवर
सांगोपांग चर्चा करणारें

प्रवासी—मासिक

वा. व. म. ऑ. नें ३ रु. कोणत्याहि
महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.
प्रवासी कार्यालय, ९२८ सदाशिव पेठ, पुणें २.

पुण्याचें स्वागत लॉज

पुण्याच्या "स्वागत लॉज"चे पाहुणे, म्हणजे चांगल्या गोष्टींचे पुरस्कर्ते असल्याची १०० टक्के खात्री !
स्वागत लॉजिंग-बोर्डिंग, डेक्कन जिमखाना, फोन ४०६०


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.